# व्यंकटेश महाविद्यालयात ‘अविष्कार 2K25’ पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेचे आयोजन

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नित श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी येथील बी. कॉम (आय.टी.) विभागामार्फत ‘अविष्कार 2K25’ पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा बुधवारी, दि. २४ सप्टेंबर २०२५ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात सहाय्यक प्राध्यापक श्री. एम. डी. जाखले यांच्या स्वागत व परिचयाने झाली. स्पर्धेचे परीक्षण करण्यासाठी डॉ. के. जी. खराडे, सहाय्यक प्राध्यापक, संगणकशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि श्री. सी. ए. पाटील, प्रमुख, बीसीए विभाग, डीकेएएससी, इचलकरंजी हे मान्यवर परीक्षक म्हणून उपस्थित होते. या वेळी सह. प्रा. डॉ. एस. एच. अंबवडे यांनी विद्यार्थ्यांना ‘अविष्कार’ उपक्रमाचे मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांच्या ज्ञानविकासासाठी संशोधन, नाविन्यपूर्णता व सादरीकरण कौशल्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी विद्यार्थ्यांना अशा शैक्षणिक स्पर्धांमधून आत्मविश्वास आणि संशोधनवृत्ती विकसित करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचा समारोप सहाय्यक प्राध्यापक सौ. एस. एस. परदेशी यांनी दिलेल्या आभारप्रदर्शनाने झाला. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन कु. सनिका कुगुळे व कु. रेवती पाटील यांनी केले. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी संशोधनाधिष्ठित विविध विषयांवर आकर्षक व माहितीपूर्ण पोस्टर सादर करून उत्साहपूर्ण सहभाग नोंदविला. स्पर्धेने विद्यार्थ्यांना त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पना मांडण्यास, चिकित्सक विचार करण्यास तसेच संवादकौशल्य विकसित करण्यास एक प्रभावी व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

